बीड ।जालना। छत्रपती संभाजीनगर । पुणे । अहमदनगर,सोलापूर,नागपूर,यवतमाळ → आर. एन. आय. एमएएच /एमएआर / २०१४/ ५८०९० → शुक्रवार दि १६ ऑक्टोबर २०२६ → वर्ष १० वे → अंक -१३२ → पाने ४ → किंमत २ रु
Beed /Jalna/ Chatrapati Sambhajinagar / pune / Ahamadnagar → RNI : Regd.No.MAHMAR/2014/58090 → Friday Date: 16October 2026 → 10 th Year→04 Paper → Pages : 4 → Price - 2 Rupees



## साव्वी माळ

षष्ठीचे दिवशी भक्तां आनंद वर्तला हो । घेउनि दिवट्या हस्तीं हर्षे गोंधळ घातला हो । कवडी एक अर्पितां देशी हार मुक्ताफळां हो । जोगवा मागतां प्रसन्न झाली भक्तकुळा हो ।

महाराष्ट्राचा महानायक

# लोकनायक

संपादक – भारत गायकवाड

# जरांगेंच्या दसरा मेळाव्याला शिवसेनेचा विरोध

## एकनाथ शिंदेंच्या विरोधात बोलाल तर खबरदार



**बीड जिल्ह्यातील नारायण गडावर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचा दसरा मेळावा होणार आहे. हा दसरा मेळावा रद्द करावा, अशी मागणी शिवसेना शिंदे गटाचे बीड जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांनी केली आहे. त्याचबरोबर मनोज जरांगे पाटील यांना त्यांनी इशारा दिला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या विरोधात बोलाल तर खबरदार जशास तसे उत्तर दिले जाईल, असा इशारा दिला आहे.**



**लोकनायक वृत्तसेवा –**
बीडच्या नगद नारायण गडावर मनोज जरांगे पाटील यांचा दसरा मेळावा २० ऑक्टोबर रोजी पार पडणार आहे. या मेळाव्याची जय्यत तयारी सुरू असतानाच आता शिवसेना शिंदे गटाने विरोधाची भूमिका घेतली आहे. एकीकडे बीड जिल्हा भीषण दुष्काळाच्या संकटात होरपळत असताना मेळाव्याच्या आयोजनावरून राजकीय वातावरण तापलं आहे. त्यामुळे जरांगे पाटलांच्या मेळाव्याआधीच बीडमध्ये संघर्षाची ठिणगी पडली आहे.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आंदोलनात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर प्रखर टीका केली होती. एकनाथ शिंदे यांनी समजाला धोका दिला असल्याचा गंभीर आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला. तसेच त्यांच्यावरील विश्वास उरला नसल्याची टीका मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आंदोलनाच्या वेळी केली होती. या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर जोरदार टीका केली होती. विरोधात बोलाल तर जशास तसे उत्तर देऊ, अशी आक्रमक भूमिका शिंदेसेनेने घेतली आहे. दुसरीकडे स्थानिक पातळीवरही शिंदेसेनेचे कार्यकर्ते जरांगे पाटील यांनी विरोध करीत आहेत. बीडच्या श्रीक्षेत्र नगद नारायण गडावर मनोज जरांगे पाटील यांचा दसरा मेळावा २० ऑक्टोबर **पान २ वर**

# बीड शहरातील रामदासजी आठवले यांच्या विराट सभेचे साक्षीदार व्हा:विष्णू जोगदंड

**लोकनायक वृत्तसेवा –**
केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची बीड शहरात शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ठीक ४ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड येथे आयोजित करण्यात आली आहे. रिपाइंच्या वतीने आयोजित विराट जाहीर सभेचे आयोजन खालील मागण्यांची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी युवा रिपाइं प्रद-



ेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केले आहे.

राज्यासह मराठवाड्यात व बीड जिल्ह्यात पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. दुष्काळामुळे जनावरांच्या चाऱ्याचा पाण्याचा व मोल मजुरांच्या पोटापाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. पावसाअभावी राज्यभर दुष्काळ जाहीर झाला आहे. दुष्काळ जन्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १ लाख रुपये मदत देण्यात यावी. शेतमजूर, कामगार व मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या कुटुंबियांना ५० हजार रुपये मदत जाहीर करण्यात यावी. अनु जातीमधील ५९ जातींच्या आरक्षणातील उपव-र्गीकरणाची प्रक्रिया रद्द करण्यात यावी. कसत असलेल्या २०११ पर्यंतच्या गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात **पान २ वर**

# बीडमध्ये रामदास आठवलेंच्या सभेचे रणशिंग; पप्पू कागदे मैदानात: राजू जोगदंड

**लोकनायक वृत्तसेवा –**
केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची बीड शहरात शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ठीक ४ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड येथे आयोजित करण्यात आली आहे. रिपाइंच्या वतीने आयोजित विराट जाहीर सभेच्या तयारीसाठी बीड शहरासह जिल्हाभरात बैठकांचे आयोजन करुन विराट जाहीर सभेचे नियोजन करण्यात आले आहे.



शहरात होर्डिंग, कामाची, निळे झेंडे लावून सभेची जय्यत तयारी करण्यात आली आहे. या विराट जाहीर सभेस हजारोंच्या संख्यने उपस्थित राहावे असे आवाहन राजू जोगदंड यांनी केले आहे. राज्यासह **पान २ वर**

# मंत्री रामदास आठवलेंच्या विराट जाहीर सभेस उपस्थित रहा:भास्कर जावळे

**लोकनायक वृत्तसेवा –**
केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची बीड शहरात शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ठीक ४ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड येथे युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली खालील मागण्याची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी विराट जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. राज्यासह मराठवाड्यात व बीड जिल्ह्यात पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. दुष्काळामुळे



जनावरांच्या चाऱ्याचा पाण्याचा व मोल मजुरांच्या पोटापाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. पावसाअभावी राज्यभर दुष्काळ जाहीर झाला आहे. दुष्काळ जन्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १ लाख रुपये मदत देण्यात यावी. शेतमजूर, कामगार व मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या कुटुंबियांना ५० हजार रुपये मदत जाहीर करण्यात यावी. अनु जातीमधील ५९ जातींच्या **पान २ वर**




शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

प्रो.सागर गायकवाड मो.9860145412
सागर ग्लास हाऊस
आमच्याकडे सर्व प्रकारचे विन्डोज,डोअर, ॲल्युमिनियम पार्टीशनची कामे केली जातील तसेच लॅमिनेशन डोअर सनमाइक डोअर फायबर डोअर सागवन डोअर योग्य भावत तयार करुण मिळतील.
पत्ता: श्री संत सावतामाळी चौक कृष्णमंदीर रोड बीड

तुमच्या व्यवसायाला डिजिटल बनवा!
वेबसाईट • ॲप • सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट
वेबसाईट
- बिझनेस वेबसाईट
- ई-कॉमर्स वेबसाईट
- कंपनी / कॉर्पोरेट वेबसाईट
- स्कूल / कॉलेज वेबसाईट
- बुकिंग / सर्व्हिस वेबसाईट
मोबाईल ॲप
- Android App
- iOS App
- ई-कॉमर्स ॲप
- बुकिंग ॲप
- डिलिव्हरी ॲप
- बिझनेस मॅनेजमेंट ॲप
सॉफ्टवेअर
- कस्टम सॉफ्टवेअर
- इन्व्हेंटरी मॅनेजमेंट
- CRM सॉफ्टवेअर
- स्कूल / इन्स्टिट्यूट सॉफ्टवेअर
- कर्मचारी मॅनेजमेंट सिस्टीम
- कस्टम सॉफ्टवेअर – तुमच्या गरजेनुसार!
★ आधुनिक तंत्रज्ञान • वेबवर डिझाइन • परवडणाऱ्या दरात उत्कृष्ट सेवा ★
आजच संपर्क करा! | 9405941894 / 7796747593
संभाजीनगर, महाराष्ट्र

लोकनायक

शुक्रवार दि १६ ऑक्टोबर २०२६



## जाहीर प्रगटन

श्री.एन.एम. वाली, दिवाणी न्यायाधिश क. स्तर, धारुर यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज क. २८२/२०२६

निशाणी क. १३/क

१. देवराव पिता विठ्ठल कोल्हे वय ६० वर्षे धंदा मजुरी रा देवदहिफळ ता धारूर जि बीड

**) अर्जदार**

**विरुध्द**

**) सामनेवाला**

**गैरअर्जदार**

१. केशव पिता मुरलीधर कोल्हे वय ४७ वर्षे धंदा मजुरी रा देवदहिफळ ता धारूर जि बीड

महादेव पिता मुरलीधर कोल्हे वय ४५ वर्षे धंदा मजुरी रा देवदहिफळ ता धारूर जि २. बीड

३. चंद्रकला भ्र मुरलीधर कोल्हे वय ६५ वर्षे धंदा मजुरी रा देवदहिफळ ता धारूर जि बीड

तमाम जनतेस या जाहिरनामा/जाहिरनोटीस द्रवारे असे कळिवण्यात येते की, ज्या पेक्षा मयत क १ विठठ्ल पिता देवनाजी कोल्हे मौजे देवदहिफळ ता. धारुर जि. बीड यांचे दिनांक २०/०५/२००५ रोजी निधन झाले आहे. मयत क २ मालनबाई भ्र विठ्ठल कोल्हे मौजे देवदहिफळ ता धारूर जि बीड यांचे दिनांक ०५/०८/२००७ रोजी निधन झाले आहे. मयत क ३ मुरलीधर पिता विठ्ठल कोल्हे मौजे देवदहिफळ ता धारूर जि बीड यांचे दिनांक ०५/०४/२०२३ रोजी निधन झाले आहे. त्यांना अर्जदार हे एकमेव कायदेशीर वारसदार आहेत.

मयत क १ विठठ्ल पिता देवनाजी कोल्हे, मयत क २ मालनबाई भ्र विठ्ठल कोल्हे व मयत क ३ मुरलीधर पिता विठ्ठल कोल्हे यांचे पश्चात शासकिय /निमशासकिय व इतर कार्यालयीन कामासाठी अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता अर्जदार हे मयत क १ विठठ्□ल पिता देवनाजी कोल्हे, मयत क २ मालनबाई भ्र विठ्ठल कोल्हे व मयत क ३ मुरलीधर पिता विठ्ठल कोल्हे यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोपीत करुन वारस प्रमाणपत्र देणे बाबत कुणाचीही अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी हि जाहिर नोटीस प्रसिध्द झालेले तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे. न्यायालयात प्रत्यक्ष अथवा वकिलांमार्फत हजर होउन लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही, तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करुन पुरावाव घेउन मे. न्यायालयात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

आज तारीख १३/१०/२०२६ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिला.

प्रकरणात पुढील दिनांक ०९/१२/२०२६०

**क. लिपीक**

**हुकूमावरुन**
**सहाययक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर, धारुर**

## जाहीर प्रगटन

# नगर पंचायत कार्यालय, वडवणी

दि.१५/१०/२०२६

**अर्जदाराचे नाव–** श्री. गोविंद श्रीहरी मुंडे

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव–१) श्री. शिवराज खिराजी पाखरे २) श्री. प्रकाश सुरेशराव मुंडे ३) श्री. राजेंद्र नानासाहेब भावले

**प्रकरण –** नाव नोंदणी बाबत गट क्र.४१४ १. प्लॉट क्र. ३२,३३,३४,३५,३६, वडवणी येथील आहे. सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस पमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंदमध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याचे चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार– १) प्लॉट क्र.३२ पुर्वपश्चिम १२ मी. दक्षिणोत्तर ९.१५ मी. एकुण क्षेत्रफळ १०९.८० चौ.मी. २) प्लॉट क्र.३३ पुर्वपश्चिम १२ मी. दक्षिणोत्तर ९.१५ मी. एकुण क्षेत्रफळ १०९.८० चौ.मी. ३) प्लॉट क्र.३४ पुर्वपश्चिम १२ मी. दक्षिणोत्तर ९.१५ मी. एकुण क्षेत्रफळ १०९.८० चौ.मी. ४) प्लॉट क्र.३५ पुर्वपश्चिम १२ मी. दक्षिणोत्तर ९.१५ मी. एकुण क्षेत्रफळ १०९.८० चौ.मी. ५) प्लॉट क्र.३६ पुर्वपश्चिम १२ मी. दक्षिणोत्तर १०.७५ मी. एकुण क्षेत्रफळ १२९.१२ चौ.मी. एकुण क्षेत्रफळ ५६८.३२ चौ.मी.

**पुर्व– प्लॉट क्र. २७,२८,२९,३० व ३१**

**पश्चिम–०९ मीटर रस्ता**

**दक्षिण– ०९ मीटर रस्ता**

**उत्तर– ओपन स्पेस**

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्यासह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**–स्वा–मुख्याधिकारी**
**नगर पंचायत वडवणी**

# परळीच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांची ऑल -एलएसजी च्या राज्य गव्हर्निंग मेंबरपदी निवड



**लोकनायक वृत्तसेवा –**
परळी वैजनाथच्या लोकनिर्वाचीत नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांची स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात सर्वात जुन्या व राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर गेल्या १०० वर्षांपासून कार्यरत असलेल्या शासनमान्य प्रतिष्ठित ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ–गव्हर्नमेंटच्या (ऑल –एलएसजी) महाराष्ट्र राज्य गव्हर्निंग मेंबरपदी बिनविरोध निवड झाली आहे. परळीकरांसाठी ही अत्यंत अभिमानास्पद बाब असुन ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ–गव्हर्नमेंटच्या नियामक मंडळावर निवड होणाऱ्या सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी या परळीतील पहिल्याच नगराध्यक्ष ठरल्या आहेत. त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे. पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना पंकजाताई मुंडे व राज्याचे माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या खंबीर नेतृत्वाखाली नगर परिषदेच्या कारभारात शहराच्या विकासासह नागरी सुविधांचे नियोजन आणि नागरिकांच्या प्रश्नांवर अविरतपणे कार्यरत असणाऱ्या परळीच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांना आता शहराबरोबरच राज्यस्तरावरही काम करण्याची संधी मिळाली आहे. ही निवड परळीच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे. या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित विविध प्रश्न, प्रशासकीय अनुभव आणि नागरी विकासाच्या विषयांवर व्यापक स्तरावर सहभाग नोंदविण्याची संधी मिळणार आहे.परळीत यापूर्वी कोणालाही अशी संधी मिळालेली नाही. यादृष्टीने ही निवड ऐतिहासिक व परळीचा गौरव समृद्ध करणारी ठरली आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सक्षमीकरणासाठी १०० वर्षांपासून कार्यरत संस्था ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ–गव्हर्नमेंट ही संस्था १९२६ पासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत आहे. महानगरपालिका, नगरपरिषदा आणि अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकप्रतिनिधी व अधिकारी यांना प्रशिक्षण देणे, नागरी प्रशासनात सुधारणा घडविणे, घनकचरा व्यवस्थापन, ई–गव्हर्नन्स आणि शहरी विकासाच्या विषयांवर मार्गदर्शन करणे, अशी संस्थेची प्रमुख कार्यक्षेत्रे आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रशासनाशी संबंधित प्रश्न आणि शहरांच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबत या संस्थेच्या व्यासपीठावर विचारविनिमय केला जातो. त्यामुळे संस्थेच्या राज्यस्तरीय कामकाजात सहभागी होण्याची संधी नगराध्यक्षा धर्माधिकारी यांच्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.व्यापक कार्यक्षेत्रात प्रतिनिधित्व :१७ ऑक्टोबरला मुंबईत शपथग्रहण समारंभ

नगराध्यक्षा सौ. पद्मश्री धर्माधिकारी यांच्या निवडीचा शपथग्रहण समारंभ शनिवार, १७ ऑक्टोबर रोजी मुंबईतील अंधेरी येथे होणार आहे. परळी साठी अभिमानास्पद व परळीच्या गौरवात मानाचा तुरा रोवणाऱ्या या निवडीबद्दल तमाम परळीकर यांच्या वतीने त्यांना शुभेच्छा व्यक्त करत सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

राजकिशोर (पापा) मोदी यांचे महत्त्वपूर्ण योगदान ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ– गव्हर्नमेंट या संस्थेवर गव्हर्निंग मेंबरपदी सौ.पद्मश्री धर्माधिकारी यांच्या निवडीसाठी अंबाजोगाईचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर (पापा) मोदी यांचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन व योगदान राहिले. या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांमधील व्यापक कार्यक्षेत्रात काम करण्याची संधी आता परळीच्या नगराध्यक्षांना मिळणार आहे.परळीकरांमुळेच ही संधी; संधीचे सोने करून परळीचा नावलौकिक करू – नगराध्यक्षा राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे व राज्याचे माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या खंबीर नेतृत्वाखाली आणि माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आपण काम करत आहोत. परळीचा सर्वांगीण विकास आणि परळीकर ांचा विश्वास सार्थ ठरविण्याची मोठी जबाबदारी आपल्यावर आहे. परळी नगर परिषदेच्या माध्यमातून काम करत असताना राज्यस्तरावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात मिळालेली ही व्यापक जबाबदारी ही परळीकर जनतेच्या सेवेसाठी मोठी संधी आहे. या संधीचे सोने करून आपण परळीकरांचा नावलौकिक समृद्ध करण्याचा निश्चित प्रयत्न करू अशी प्रतिक्रिया या निवडीनंतर नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी व्यक्त केली.

# केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या जाहीर सभेस प्रचंड संख्येने उपस्थित रहा – रमेश गंगाधरे

**लोकनायक वृत्तसेवा –**
शहरात होणाऱ्या केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या जाहीर सभेस जनतेने प्रचंड संख्येने उपस्थित राह–ावे असे आवाहन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे यांनी केले आहे. याविषयी दिलेल्या प्रसिद्धिपत्रकात नमूद केले आहे की, बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात असलेल्या छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण मैदान येथे शुक्रवार दिनांक १६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ०४:०० वाजता युवा रिपाई प्रद–ेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पूजी कागदे



यांच्या नेतृत्वाखाली या सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेत जनतेला संबोधित करण्याकरिता रिपाई (ए) चे अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री रामदासजी आठवले येत आहेत. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री येत असलेल्या या सभेस अत्यंत महत्त्व असून दुष्काळी परिस्थिती हाताळण्याकरिता केंद्र शासन नेमके कसे नियोजन करीत आहे. याविषयी आठवले साहेबांकडून जनतेला माहिती मिळण्याची शक्यता आहे. तसेच गायरानसह दीनदलित, गोरगरिबांच्या अनेक प्रलंबित प्रश्नांविषयीही या सभेतून आठवले साहेब मार्गदर्शन करू शकतात. तेव्हा या सभेसाठी जनतेने प्रचंड संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन रमेशराव गंगाधरे यांनी केले आहे.

पान १ वरून

**बीड शहरातील रामदासजी आठवले यांच्या ....**
यावीत. महागाई निर्देशांकानुसार विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्यात यावी.आदी मागण्याची पूर्तता करण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड शहरात दि. १६ ऑक्टोबर २०२६ शुक्रवार रोजी होणाऱ्या विराट जाहीर सभेस बीड जिल्ह्यातील रिपाइं पदाधिकारी, गायरान धारक, महिला, शेतमजूर, कामगार यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे.असे आवाहन रिपाइंचे जिल्हा प्रसिद्धिप्रमुख विष्णू जोगदंड, जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड, मझर खान, अविनाश जोगदंड, महेश आठवले, विलास जोगदंड, शाम वीर, संभाजी गायकवाड, भैय्या मस्के, महेंद्र वडमारे, मनोज बोराडे, अक्षय कोकाटे, भैय्या साळवे, पप्पू वाघमारे, संजय हनवते, अमोल धन्वे, सचिन वडमारे, धम्मा पारवेकर, के.के कांबळे,आप्पा मिसळे, गौतम कांबळे आदींनी केले आहे.

**जरांगेंच्या दसरा मेळाव्याला....**
रोजी पार पडणार आहे. या मेळाव्याची जय्यत तयारी सुरू असतानाच आता शिवसेना शिंदे
गटाने विरोधाची भूमिका घेतली आहे.

**बीडमध्ये रामदास आठवलेंच्या सभेचे रणशिंग; ...**
मराठवाड्यात व बीड जिल्ह्यात पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. दुष्काळामुळे जनावरांच्या चाऱ्याचा पाण्याचा व मोल मजुरांच्या पोटापाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. पावसाअभावी राज्यभर दुष्काळ जाहीर झाला आहे. दुष्काळ जन्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १ लाख रुपये मदत देण्यात यावी. शेतमजूर, कामगार व मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या कुटुंबियांना ५० हजार रुपये मदत जाहीर करण्यात यावी. अनु जातीमधील ५९ जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाची प्रक्रिया रद्द करण्यात यावी. कसत असलेल्या २०११ पर्यंतच्या गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. महागाई निर्देशांकानुसार विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्यात यावी.आदी मागण्याची पूर्तता करण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड शहरात दि. १६ ऑक्टोबर २०२६ शुक्रवार रोजी होणाऱ्या विराट जाहीर सभेस बीड जिल्ह्यातील रिपाइं पदाधिकारी, गायरान धारक, महिला, शेतमजूर, कामगार यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे.असे आवाहन रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड, मझर खान, अविनाश जोगदंड, महेश आठवले, विलास जोगदंड, शाम वीर, संभाजी गायकवाड, भैय्या मस्के, महेंद्र वडमारे, मनोज बोराडे, अक्षय कोकाटे, भैय्या साळवे, पप्पू वाघमारे, संजय हनवते, अमोल धन्वे, सचिन वडमारे, धम्मा पारवेकर, के.के कांबळे,आप्पा मिसळे, गौतम कांबळे आदींनी केले आहे.

**मंत्री रामदास आठवलेंच्या ....**
आरक्षणातील उपवर्गीकरणाची प्रक्रिया रद्द करण्यात यावी. कसत असलेल्या २०११ पर्यंतच्या गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. महागाई निर्देशांकानुसार विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्यात यावी.आदी मागण्याची पूर्तता करण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड शहरात दि. १६ ऑक्टोबर २०२६ शुक्रवार रोजी होणाऱ्या विराट जाहीर सभेस बीड तालुक्यातील रिपाइं पदाधिकारी, गायरान धारक, महिला, शेतमजूर, कामगार यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन रिपाइंचे कामगार आघाडी बीड तालुकाअध्यक्ष भास्कर जावळे, सतिष शिनगारे, अविनाश अवघड, भाऊसाहेब कांबळे, राजू वक्ते, राहुल कांबळे, देवानंद वाघमारे, नामदेव वाघमारे, रतन वाघमारे, विशाल इंगोले, अप्पा शेळके, बंडू ठोंबरे, भीमराव घोडेराव, विशाल गव्हाणे, आप्पा पवार, मनोज ससाणे, प्रणव पायाळ, भैय्या वाघमारे, आकाश साबळे, कृष्णा साबळे, संतोष जाधव, अजित सावंत, रविंद्र वीर, नवनाथ डोळस, बबलू सोन–वणे, समाधान गवळी, कल्याण सोनवणे, सुशील जावळे, अमोल डावकर,सुलेमान शेख, प्रदिप जावळे, अमोल कोकाटे, अनिकेत जावळे, आदींनी केले आहे.

## जाहीर प्रगटन

# नगर पंचायत कार्यालय, वडवणी

दि.१५/१०/२०२६

अर्जदाराचे नाव– श्री. गणेश लक्ष्मण दराडे

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव– १) श्री. विनोद गोपिकिसन चरखा २) श्री. विजयकुमार मोतिलाल कासट ३) श्री. राम रघुनाथ व्हरकटे ४) श्री. सुशिल बाबुलाल कासट ५) श्री. सुशिल रणछोडदास सारडा

प्रकरण– नाव नोंदणी बाबत गट क्र. ४४४ प्लॉट क्र. ०६ पैकी वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस पमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंदमध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याचे चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार– पु.प.९ मी. द.ऊ.३०.४८ मी एकुण क्षेत्रफळ २७४.३२ चौ.मी. १. विनोंद यांची १२०.५२ चौ.मी. विक्रेता क्र.२ ते ५ यांची प्रत्येकी ३८.४८ चौ. मी. एकुण क्षेत्रफळ २७४.३२ चौ.मी.

पुर्व– प्लॉट क्र.०५

पश्चिम–प्लॉट क्र.६ चा उर्वरीत भाग

दक्षिण– प्लॉट क्र.९ व १०

उत्तर– पिंपळनेर–वडवणी रस्ता

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्यासह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**–स्वा–मुख्याधिकारी**
**नगर पंचायत वडवणी**

पान ४ वरून

**गेवराईत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत...**
वेळीच निदान करणे, आवश्यकतेनुसार तज्ज्ञांकडे संदर्भित करणे आणि विद्यार्थ्यांना योग्य उपचार मिळवून देणे, हा राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाचा महत्त्वाचा उद्देश आहे. गेवराई येथे आयोजित या शिबिरामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक शस्त्रक्रियांचे उपचार स्थानिक पातळीवर उपलब्ध झाले असून, बालआरोग्य संवर्धनासाठी आरोग्य विभागाच्या प्रयत्नांना बळ मिळाले आहे.

**मुख्यमंत्री साहेब,जनाची नाही....**
अनेकांनी दौरे केले. या दौऱ्यांवर शासनाचा वेळ आणि पैसा खर्च झाला; मात्र प्रत्यक्ष संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या हातात तातडीने मदतीची रक्कम पडणार नसेल, तर या पाहणी दौऱ्यांचा उपयोग काय?पुर्ण मदत डिसेंबरपर्यंत देण्याची घोषणा म्हणजे शेतकऱ्यांची थट्टाच आहे, अशी टीका त्यांनी केली. दिवाळीच्या सणाला घरात गोडधोड बनवण्यासाठी पैसे नाहीत, मुलांना कपडे घेण्यासाठी पैसे नाहीत आणि दुसरीकडे शेतातील पीक डोळ्यांदेखत वाया गेले आहे. अशा शेतकऱ्यांना मदतीसाठीही प्रतीक्षा करावी लागत असेल, तर सरकारच्या संवेदनशीलतेवर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक असल्याचे त्यांनी म्हटले.

सरकारच्या मदतीच्या घोषणेवर उपरोधिक टीका करत कॉ. नागरगोजे यांनी मुख्यमंत्र्यांना थेट आव्हान दिले. 'मुख्यमंत्री साहेब, दिवाळीसाठी शेतकऱ्यांना पाच हजार रुपये देऊन दिवाळी गोड करावी असे तुम्हाला वाटत असेल तर मीच तुम्हाला पाच हजार रुपये पाठवतो तुम्ही स्वतःची दिवाळी गोड करून दाखवा. कृपया तुमचा खाते क्रमांक कळवा!' असा टोला त्यांनी लगावला.

नाशिकच्या कुंभमेळ्यासाठी प्रस्तावित ४६ हजार कोटी रुपयांच्या खर्चाचा उल्लेख करत त्यांनी सरकारच्या प्राधान्यक्रमावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. बाबा–बुवांवरील खर्चापेक्षा दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत, शेतीचे पुनरुज्जीवन आणि ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी निधी खर्च करावा, अशी मागणी त्यांनी केली.

२०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक भागांत शेतजमिनींचे नुकसान झाले, पिके वाहून गेली, जनावरांचे नुकसान झाले, घरे पडली आणि विहिरी बुजल्या. मात्र, अनेक शेतकऱ्यांना अद्याप नुकसानभरपाई मिळालेली नसल्याचा आरोप ना–गरगोजे यांनी केला.२०२५ च्या खरीप पीकविम्यापोटी प्रतिहेक्टरी १७ हजार ५०० रुपये देण्याबाबत केलेल्या घोषणेची अंमलबजावणी अद्याप झालेली नसल्याचा दावाही त्यांनी केला. त्याचबरोबर २०२३ मधील उर्वरित ७५ टक्के खरीप पीकविमा आणि २०२० मधील थकीत पीकविम्याचा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

शेतकऱ्यांच्या हक्काचे पैसे वर्षानुवर्षे अडकून पडणार असतील, तर विमा कंपन्या आणि शासनाच्या यंत्रणेचा उपयोग तरी काय? असा सवाल करत त्यांनी थकीत पीकविम्याची रक्कम तातडीने वितरित करण्याची मागणी केली.अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेच्या अंमलबजा–वणीवरही नागरगोजे यांनी प्रश्न उप–स्थित केले. शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्याऐवजी जाचक अटींमुळे लाखो शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहण्याची भीती त्यांनी व्यक्त केली. शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला असताना कर्जमाफीच्या प्रक्रियेत गुंतागुंत वाढविण्याऐवजी सरकारने स्पष्ट आणि सर्वसमावेशक निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. याचवेळी विजय मल्लया, मेहुल चोक्सी आणि नीरव मोदी यांच्यासारख्या आर्थिक गैरव्यवहारांच्या प्रकरणांचा उल्लेख करत मोठ्या आर्थिक घोटाळ्यांतील आरोपींकडून वसुलीबाबत सरकारने आपली भूमिका स्पष्ट करावी, असेही त्यांनी म्हटले.राज्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी ७० हजार रुपये नुकसानभरपाई द्यावी, २०२० ते २०२५ या कालावधीतील प्रलंबित पीकविम्याची रक्कम अदा करावी आणि शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी, अशा प्रमुख मागण्या कॉ. महादेव नागरगोजे यांनी केल्या आहेत.

दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. पेरणी, बियाणे, खते, औषधे आणि मशागतीसाठी केलेला खर्चही वसूल होण्याची शक्यता मावळली आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना केवळ आश्वासनांवर जगायला लावणे अन्यायकारक आहे. सरकारने तातडीने ठोस निर्णय घेऊन नुकसानभरपाई, पीकविमा आणि कर्जमाफीचे प्रश्न मार्गी लावावेत, अशी मागणी त्यांनी केली.'शेतकऱ्यांना मदतीची गरज आज आहे; डिसेंबरमध्ये नव्हे! सरकारने घोषणांचा खेळ थांबवून शेतकऱ्यांच्या खात्यात तातडीने पैसे जमा करावेत,' असा इशारा देत भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि किसान सभेच्या वतीने राज्य सरकारच्या घोषणेचा निषेध करण्यात येत असल्याचे कॉ. महादेव नागरगोजे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

**आष्टी तालुक्यात दुष्काळाचे सावट! पाणीटंचाईवर तातडीने ...**
राहिले आहे. अशा परिस्थितीत शासन आणि प्रशासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ठोस पावले उचलण्याची गरज आहे.

पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांची होऊ शकते धावपळ

पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने गावोगावी असलेल्या विहिरी, बोअरवेल आणि तलावांमधील पाणीसाठ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. उन्हाळ्यापूर्वीच पाणीटंचाईचे संकट निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने आतापा–सूनच नियोजन करणे आवश्यक आहे. ज्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची उपलब्धता कमी झाली आहे, त्या गावांची पाहणी करून तातडीने उपाययोजना कराव्यात.

नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी दूरवर भटकंती करावी लागू नये, तसेच महिलांवर आणि ज्येष्ठ नागरिकांवर पाणी आणण्याचा अतिरिक्त भार पडू नये, यासाठी गरजेनुसार टँकर सुरू करणे महत्त्वाचे आहे. पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर होण्याची वाट न पाहता संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, अशी मागणी ढोबळे पाटील यांनी केली आहे.

जनावरांच्या चारा–पाण्याची समस्या गंभीर

शेतीबरोबरच पशुधन हाही ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे. मात्र, पावसाअभावी शेतातील पिके करपल्याने हिरव्या चाऱ्याची उपलब्धता कमी होत आहे. जनावरांना पुरेसा चारा आणि पाणी मिळवून देणे शेतकऱ्यांसाठी कठीण बनत आहे. त्यामुळे पशुपालकांच्या अडचणी वाढत असून, या प्रश्नाकडे प्रशासनाने विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

जनावरांना चारा–पाण्याअभावी हाल सहन करावे लागू नयेत, यासाठी शासनाने परिस्थितीचा आढावा घ्यावा. गरज असलेल्या भागांमध्ये चारा उपलब्ध करून देण्यासह पशुधनासाठी आवश्यक उपाययोजनांचे नियोजन करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

प्रशासनाने कागदोपत्री नव्हे, तर प्रत्यक्ष उपाययोजना कराव्यात

पाणीटंचाई आणि दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करण्यासाठी केवळ आढावा घेऊन चालणार नाही, तर प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. महसूल विभाग आणि संबंधित यंत्रणांनी गावनिहाय पाणी उपलब्धतेची माहिती घ्यावी. पाण्याचे स्रोत, विहिरींची स्थिती आणि गावांतील पाणीपुरवठा योजनांची तपासणी करून आवश्यक त्या ठिकाणी तातडीने उपाययोजना कराव्यात.

टंचाईग्रस्त गावांमध्ये टँकर सुरू करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया वे–गाने पूर्ण करावी. पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा आणि शेतीच्या नुकसानीमुळे अडचणीत आलेल्या कुटुंबांना मदत देण्याबाबत प्रशासनाने गांभीर्याने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

संकटग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी

पावसाअभावी खरीप हंगामाचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे योग्य सर्वेक्षण करून शासनाच्या नियमानुसार मदत उपलब्ध करून द्यावी. शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळाल्यास आगामी हंगामासाठी तयारी करणे शक्य होईल. त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांच्या अडचणींकडे सहानुभूतीपूर्वक पाहून तातडीने निर्णय घ्यावेत, असेही निवेदनातून सांगण्यात आले आहे.

रवि (काका) ढोबळे पाटील यांचे प्रशासनाला आवाहन

आष्टी तालुक्यातील नागरिक, शेतकरी आणि पशुपालक यांना पाणीटंचाईच्या संकटाचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासनाने वेळेत कार्यवाही करावी. गावोगावी परिस्थितीचा आढावा घेऊन आवश्यक त्या ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा. तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर शासनाकडून मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी रवि (काका) ढोबळे पाटील यांनी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

आता प्रशासन या मागणीची कितपत दखल घेते आणि पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी कोणत्या उपाययोजना राबवते, याकडे आष्टी तालुक्यातील नागरिक आणि शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

**चोरीचा उलगडा;स्थानिक गुन्हे शाखेची....**
अकबर लुकमान खान (वय ३२ वर्षे, रा. जळगाव), परवेज मेहमूद सय्यद (वय २२ वर्षे, रा. अहिल्यानगर) यांचा समावेश आहे. तर मोईन बादशहा शेख (रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर), अशपाक सबीर खान (रा. पाचोरा, जि. जळगाव) हे आरोपी फरार आहेत. अटक केलेल्या आरोपींकडून पोलिसांनी ५०० रुपयांच्या १४२ नोटा आणि १०० रुपयांच्या ४ नोटा असा एकूण ७१,४००/– रुपयांचा रोकड मुद्देमाल जप्त केला आहे. ही यशस्वी कामगिरी बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड व त्यांच्या पथकाने केली आहे. पोलीस पुढील तपास करत असून आरोपींकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

राजस्थान राज्यातील गुन्ह्यांशी टोळीचा संबंध

या तपासा दरम्यान निष्पन्न झाले आहे की, या आंतरराज्य टोळीचे राजस्थान राज्यातील अजमेर येथील पोलीस ठाण्यांच्या हद्दीत झालेल्या चोरीच्या गुन्ह्यांशी देखील संबंध आहेत. यामध्ये पोलीस स्टेशन गंज, अजमेर गु.र.नं. २१३/२०२६, पोलीस स्टेशन आदर्श नगर, अजमेर – गु.र.नं. २०६/२०२६ या गुन्ह्यांचा समावेश आहे.

**अहिल्यादेवी सृष्टी चोंडीतच झाली पाहिजे...**
अहिल्यादेवी सृष्टीचे योग्य ठिकाण! विधान परिषद सभापती मा. राम शिंदे साहेब यांनी अहिल्यादेवी सृष्टी त्यांच्या जन्मगावी चोंडी येथेच व्हावी, अशी भूमिका मांडली आहे. तसेच, गुजरातमधील 'स्टॅच्यू

loknayak 16.10.2026:Copy of Layout 1 10/15/2026 11:53 PM Page 3



# जामखेड मध्ये थरार! चहा पिण्यासाठी बसलेल्या तरुणावर सत्तुरने हल्ला डावा हात मनगटापासून तोडला

## तोंड बांधून आलेल्या दोघांचा हल्ला, जखमी तरुणाला अहिल्यानगरला हलवले; पोलिसांकडून तपास सुरू

**लोकनायक वृत्तसेवा –** जामखेड शहरात तरुणावर सत्तुरने हल्ला केल्याची धक्कादाय घटना घडली असून या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. राहुल अंधारे हे पुढारी वड टी सेंटर येथे चहा पिण्यासाठी बसलेले असताना दुचाकीवरून आलेल्या तिघांपैकी तोंड बांधलेल्या दोघांनी हॉटेलमध्ये प्रवेश केला आणि अचानक त्यांच्यावर सत्तुरने वार केले. या हल्लूयात अंधारे यांचा डावा हात गंभीरित्या जखमी झाला असून तो तुटल्याची प्राथमिक माहिती आहे. त्यांना तातडीने पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथे हलवण्यात आले आहे.

*दुचाकी वरून तिघे आले दोघांनी केला अचानक हल्ला*

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार सायंकाळी सुमारे ७. ३५ वाजण्याच्या सुमारास राहुल अंधारे हे पुढारी वड टी सेंटर येथे चहा पिण्यासाठी बसले होते. त्याचवेळी दुचाकीवरून तिघेजण तेथे आले त्यापैकी तोंड बांधलेल्या दोघांच्या हातात सत्तूर असल्याचे सांगण्यात येते या दोघांनी हॉटेलमध्ये जाऊन अंधारे यांच्यावर अचानक वार केले. हा हल्ला अचानक झाल्याने हॉटेलमधील नागरिकांमध्ये घबराट पसरली. हल्लूयादरम्यान अंधारे यांच्या जखमांमधून उडालेले रक्त शेजारी बसलेल्या




लोकांवर उडाल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली.प्राथमिक उपचारानंतर अहिल्यानगरला हलवले.हल्लूयात गंभीर जखमी झालेल्या राहुल अंधारे यांना तातडीने खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना तातडीने अहिल्यानगर येथील रुग्णालयात हलवण्यात आले. त्यांच्या प्रकृती बाबत अधिकृत माहिती अद्याप स्पष्ट झालेली नाही.कला केंद्रातील वादाची पार्श्वभूमी?राहुल अंधारे यांच्याशी संबंधित कलाकेंद्रातील गोंधळाच्या प्रकरणात सुमारे महिनाभरापूर्वी गुन्हा दाखल झाल्याची माहिती आहे तसेच दोन दिवसापूर्वी कला केंद्रावरून वाद झाल्याचे सांगण्यात येत आहे या पार्श्वभूमीवर सदर हल्ला झाला असावा अशी चर्चा परिसरात सुरू आहे मात्र हल्लूयामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. यापूर्वीच्या घटनांचा आणि सध्याच्या हल्लूयाचा काही संबंध आहे का हे पोलिसांच्या तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

*पोलीस घटनास्थळी दाखल; तपासाला सुरुवात* घटनेची माहिती मिळतात जामखेड पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून पंचनामा केला असून हल्लेखोरांची ओळख पटवणे आणि घटनेमागील कारणांचा शोध घेण्याच्या दृष्टीने तपास सुरू केला आहे. पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस तपास करीत आहेत जामखेड शहरात भरवस्तीत घडलेल्या या हल्लूयामुळे नागरिकांमध्ये भीतीचे व चिंतेचे वातावर निर्माण झाले असून हल्लेखोरांना पोलिसांकडून कधी ताब्यात घेतले जाते आणि या घटनेमागे नेमके कारण काय याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्याचे काम उशिरापर्यंत सुरू होते.

# व्यसनाच्या विळख्यात तरुणाचा दुर्दैवी अंत; उपचारादरम्यान मृत्यू

## दारूसाठी पैसे न मिळाल्याने विषारी पदार्थ प्राशन केल्याची घटना; वलनी वस्ती परिसरात हळहळ

**लोकनायक वृत्तसेवा –** खापरखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वलनी वस्ती येथे दारूच्या व्यसनातून एका २५ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. दारू पिण्यासाठी आजीने पैसे देण्यास नकार दिल्यानंतर तरुणाने विषारी तणनाशक प्राशन केले. नागपूर येथील मेयो रुग्णालयात उपचार सुरू असताना बुधवारी (१४ ऑक्टोबर) पहाटे त्याचा मृत्यू झाला.

प्राप्त माहितीनुसार, विजय बिरजुलाल सोनवाने (वय २५, रा. वॉर्ड क्रमांक १, वलनी वस्ती, पाण्याच्या टाकीजवळ) असे मृत तरुणाचे नाव आहे. तो मजुरी करून कुटुंबाला आर्थिक हातभार लावत होता. मिळालेल्या माहितीनुसार, १३ ऑक्टोबर रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास विजयने दारू पिण्यासाठी आजी पारबताबाई यांच्याकडे पैशांची



मागणी केली. मात्र, कुटुंबाची आर्थिक परिस्थिती आणि व्यसनाचे दुष्परिणाम लक्षात घेऊन आजीने पैसे देण्यास नकार दिला. त्यानंतर विजय शेताच्या दिशेने गेला आणि त्याने तेथे तणनाशक प्राशन केले.

काही वेळातच त्याची प्रकृती खालावल्याने मित्र आदित्य शेंडे आणि आजीने त्याला तातडीने नागपूर येथील मेयो रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान बुधवारी पहाटे तीन वाजताच्या सुमारास त्याची प्राणज्योत मालवली.

घटनेची माहिती मिळताच खापरखेडा पोलिसांनी मेयो रुग्णालयात जाऊन आवश्यक पंचनामा व कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण केली. या प्रकरणी खापरखेडा पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद (मर्ग) करण्यात आली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक निकाळजे व त्यांचे सहकारी पुढील तपास करीत आहेत.

# महाराष्ट्रा शासनाचा मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत बोरगाव (आ) जिल्ह्यात तिसरे

**लोकनायक वृत्तसेवा –** महाराष्ट्र शासनाच्या समृद्ध गाव संकल्प योजने अंतर्गत राज्य शासनाच्या निवड समितीने गावात राबविण्यात आलेल्या विविध विकास कामांची दाखल घेत लोहा तालुक्यातील बोरगाव (आ) चा नांदेड जिल्ह्यात तिसऱ्या क्रमांक काढला. सदरील निवडीबद्दल विशेष कार्यक्रमातून गावाला १० लक्ष रुपयांचा शासन निधी देऊन सन्मानित करण्यात आले. तालुक्यातील बोरगाव (आ) चे पॅनल प्रमुख पुंडलिक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गावच्या सरपंच कांताबाई हंकारे, उपसरपंच जयश्री पाटील, ग्रामविकास अधिकारी, सर्व ग्रामपंचायत सदस्य व सर्व ग्रामस्थांच्या सहकार्याने गावातील जि. प.



प्राथमिक शाळा डिजिटल, शाळेसाठी विंधन विहिरीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, नवीन अंगणवाडी बांधकाम व फर्निचर, हर घर नल योजनेअंतर्गत प्रत्येकाच्या घरासमोर नळाला पाणी, गावातील नागरिकांसाठी सुमारे ३८० घरकुल, गावातील शेतकऱ्यांना शेतासाठी १० किमी लांबीचे पांदन रस्ते तसेच अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी मागेल त्याला विहीर अंतर्गत १०० सिंचन विहिरी, गावात बंदिस्त नाली, प्लेवर ब्लॉक, ८ हजार स्क्वेअर फुटाचे श्री गुरु विरशाप्पा महाराज सभामंडप, ग्रामपंचायत कार्यालयाची इमारत, स्मशानभूमीचे बांधकाम, ग्रामपंचायतीच्या वतीने मोफत पिठाची गिरणी तसेच मोफत पाणी शुद्ध पिण्याचे पाणी अशा विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ ग्रामस्थांना ग्रामपंचायतींच्या माध्यमातून मिळवून दिला. या सर्व कामाचे महाराष्ट्र शासनाच्या समितीने मुल्यमापन करून शासनाच्या वतीने देण्यात येणारा सन २०२५-२६ चा नांदेड जिल्ह्यात तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार लोहा तालुक्यातील बोरगाव (आ) साठी जाहीर झाला. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र शासनाचा, पर्यटन विकास, आमदार निधी, खासदार निधी, जिल्हा निधी असा विविध हेड खालील निधी खेचून आणून गावात विकास गंगा आणली.

सदर पुरस्कार नुकताच ग्रामपंचायत कारभाऱ्यांनी स्वीकारला. मिळालेल्या पुरस्काराबद्दल गावकऱ्यांच्या वतीने आनंद व्यक्त केला.

# अलहुदा उर्दू शाळेमध्ये वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

**लोकनायक वृत्तसेवा –** भोकरदन शहरातील अलहुदा उर्दु माध्यमिक विद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि महान विचारवंत भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त अलहुदा उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, भोकरदन येथे वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष शब्बीर अहमद कुरेशी साहेब उपस्थित होते. कार्यक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून वाचनाचे महत्त्व, पुस्तकांचे जीवनातील स्थान, डॉ. अब्दुल कलाम यांचे प्रेरणादायी जीवनकार्य तसेच विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत वाचनाची भूमिका यांसारख्या विविध विषयांवर आपली मनोगते व भाषणे सादर केली.विद्यार्थ्यांच्या भाषणांमधून वाचनाची आवड निर्माण करणे, ज्ञानाची व्याप्ती वाढविणे आणि विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन



विकसित करणे यांचा संदेश देण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपले विचार व्यक्त करण्याची संधी मिळाली, तसेच वाचनाची प्रेरणाही मिळाली.

यावेळी संस्थेचे सचिव सादिक सर, मुख्याध्यापक जलील सर, प्राचार्य युनुस सर, तसेच मुजम्मिल सर, अब्दुल कद्दूस सर, समद सर आणि इतर प्रमुख पाहुणे उपस्थित होते.डॉ. अब्दुल कलाम यांच्या विचारांना उजाळा देत विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजविणे आणि ज्ञानाधिष्ठित समाजनिर्मितीचा संकल्प दृढ करणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# केंद्र शाळा कुंडली येथे वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

**लोकनायक वृत्तसेवा –** कुंडली येथे भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त केंद्र शाळा कुडली येथे वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. डॉ. कलाम यांनी आपल्या ज्ञान, विज्ञाननिष्ठ विचार आणि शिक्षणाप्रती असलेल्या समर्पणातून देशातील लाखो विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. विद्यार्थ्यांनी भरपूर वाचन करावे, ज्ञान मिळवावे आणि मोठी स्वप्ने पाहावीत, असा त्यांचा संदेश



होता.या निमित्ताने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी वाचन उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. सर्व विद्यार्थ्यांचे वाचन घेण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि वाचन संस्कृती रुजावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक मोहन राठोड, शिक्षक अविनाश जाधवर तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# डोरलीत गोठ्यात घुसून बिबट्याचा हल्ला; बोकड ठार, बकरी गंभीर जखमी!

## बिबट्याच्या वाढत्या वावराने पशुपालक धास्तावले; तातडीच्या नुकसानभरपाईची मागणी

**लोकनायक वृत्तसेवा –** पारशिवनी तालुक्यातील डोरली येथे बुधवारी पहाटे बिबट्याने थेट बकऱ्यांच्या गोठ्यात शिरून हल्ला केल्याची घटना घडली. या हल्लूयात एका बोकडाचा मृत्यू झाला, तर दुसरी बकरी गंभीर जखमी झाली. या घटनेमुळे डोरलीसह परिसरातील शेतकरी आणि पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गोठ्यात शिरून बकऱ्यांवर हल्ला डोरली येथील शेतकरी सदाशिव शिवार उके यांच्या गोठ्यात बकऱ्या बांधलेल्या होत्या. बुधवारी पहाटेच्या सुमारास बिबट्याने गोठ्यात प्रवेश करून एका बोकडाला ठार केले, तर दुसऱ्या बकरीला गंभीर जखमी केले. जनावरांचा आवाज ऐकून उके कुटुंबीय गोठ्याकडे धावले. मात्र, तोपर्यंत बिबट्याने घटनास्थळावरून पळ काढला होता.

वन विभागाकडून घटनास्थळाची पाहणी घटनेची माहिती मिळताच पारशिवनी वनपरिक्षेत्र विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. दवंड यांनी मृत बोकडाचे शवविच्छेदन केले. वनपरिक्षेत्र अधिकारी जे. पी. मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक पी. एम. गाडेकर, शुभांगी कुरंजेकर तसेच वनमजूर रमेश कोहळे आणि मिथुन काळसर्पे यांनी घटनास्थळाची पाहणी केली.

अनेक गावांमध्ये बिबट्याचा वावर डोरलीसह शिंगोरी, सावली, भानेगाव आणि बिनासंगम परिसरात मागील अनेक महिन्यांपासून बिबट्याचा वावर असल्याचे स्थानिक नागरिक सांगतात. या परिसरात यापूर्वीही बिबट्याने पशुधनावर हल्ले केल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे शेतकरी आणि पशुपालकांमध्ये चिंतेचे वातावरण असून, पशुधनाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

नुकसानभरपाई तातडीने देण्याची मागणी बिबट्याच्या हल्लूयात पशुधनाचे नुकसान झाल्यानंतर वन विभागाकडून पंचनामे केले जातात; मात्र नुकसानभरपाई मिळण्यास विलंब होत असल्याची तक्रार शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. आधीच विविध संकटांचा सामना करणाऱ्या पशुपालकांना अशा घटनांमुळे आर्थिक फटका बसत आहे. त्यामुळे वन विभागाने नुकसानभरपाईची प्रक्रिया जलद पूर्ण करून शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

# आर्णी शहरात जाधव मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलचे मोहिनी नाईक यांचे हस्ते भव्य उद्घाटन

**लोकनायक वृत्तसेवा –** आर्णी लोकनायक प्रतिनिधी रमेश खरतडे : ग्रामीण भागातील रुग्णांना तातडीची आकस्मिक सेवा उपलब्ध व्हावी व सर्व सेवा एकाच हॉस्पिटलमध्ये उपलब्ध करून द्याव्यात, या उदात्त उद्देशाने आर्णी शहरातील जुन्या माळवी हॉस्पिटलच्या नवीन चमकदार इमारतीमध्ये जाधव मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल सुरू करण्यात आले आहे.

दिनांक १५ ऑक्टोबर २०२६ रोजी या हॉस्पिटलचे भव्य उद्घाटन पुसदच्या लोकप्रिय



नगराध्यक्षा सौ. मोहिनी ताई नाईक यांच्या शुभहस्ते पार पडले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सरचिटणीस साजिद बेग, माजी आमदार बाळासाहेब मुनगिनवार, डॉ. राहुल जाधव (एम.बी.बी.एस., एम.डी.), डॉ. नेहा जाधव (बी.ए.एम.एस. - स्त्रीरोग तज्ञ), इरा मेडिकल चे संचालक गजानन राठोड, रवि राठोड, डॉक्टरांचे आई-वडील, नातेवाईक, मित्रमंडळी तसेच परिसरातील अनेक मान्यवर उपस्थित होते.उद्घाटनाप्रसंगी मोहिनी ताई नाईक यांनी डॉ. राहुल जाधव यांच्या आई-वडिलांना चरण स्पर्श करून आशीर्वाद घेतले. हे त्यांच्यावर झालेले संस्कार आणि संस्कृतीचे प्रतीक असल्याचे उपस्थितांनी सांगितले.ग्रामीण भागातील गोरगरीब रुग्णांना वेळेवर उपचार न मिळाल्याने अनेकदा यवतमाळ, पुसद येथे जावे लागते. हीच अडचण लक्षात घेऊन डॉ. राहुल जाधव यांनी सर्व अत्याधुनिक सुविधा - २४ तास इमर्जन्सी सेवा, अतिदक्षता विभाग, प्रसूती व स्त्रीरोग विभाग, बालरोग व सर्वसाधारण औषधोपचार विभाग एकाच छताखाली उपलब्ध करून दिले आहेत. रुग्णांची प्रामाणिकपणे सेवा हेच आमचे ध्येय असल्याचे प्रतिपादन डॉ. राहुल व डॉ. नेहा जाधव यांनी केले.

लोकनायक
शुक्रवार दि १६ ऑक्टोबर २०२६


# गेवराईत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत शस्त्रक्रिया शिबिर; २६ विद्यार्थ्यांना मिळाला उपचारांचा लाभ

## बालआरोग्य संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण पाऊल; उपजिल्हा रुग्णालयात विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया

**लोकनायक वृत्तसेवा –**
शालेय वयोगटातील विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेत त्यांना वेळेवर योग्य उपचार मिळावेत, या उद्देशाने राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत गेवराई येथील उपजिल्हा रुग्णालयात शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात २६ विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. शाळा आणि अंगणवाड्यांमधील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून उपचारांची आवश्यकता असलेल्या विद्यार्थ्यांना शस्त्रक्रियेसाठी संदर्भित करण्यात आले होते.

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत तालुकास्तरीय शालेय आरोग्य पथकाच्या माध्यमातून शाळा व अंगणवाड्यांतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात येते. या तपासणीदरम्यान शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या पात्र विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना पुढील उपचारांसाठी उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथे पाठविण्यात आले होते. त्यानुसार आयोजित शिबिरात जिल्हा रुग्णालय, बीड येथील नाक, कान व घसा शस्त्रक्रियातज्ज्ञ डॉ. राहुल दुबाले यांनी विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया केल्या.

या शिबिरात २६ विद्यार्थ्यांच्या जिभेखालील जिव्हाबंध (टंग टाय) या समस्येवर शस्त्रक्रिया करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. तसेच अन्य दोन विद्यार्थ्यांवर इतर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. (शस्त्रक्रियांच्या एकूण संख्येबाबत प्रसिद्धीपूर्वी खात्री करावी.) तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना आवश्यक उपचार उपलब्ध करून देण्यात आले.




जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळंके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रौफ शेख, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संजय कदम, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. सचिन शेकडे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. एल. आर. तांदळे आणि जिल्हा समन्वयक रमेश तांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले.

उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजय कट्टे आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अभय गोंदीकर यांनी शिबिराचे नियोजन केले. शालेय आरोग्य पथकाचे नोडल अधिकारी डॉ. राजू आंधळे, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या पथकातील सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी तसेच उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथील कर्मचाऱ्यांनी शिबिराच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

शाळा आणि अंगणवाड्यांमध्ये नियमित आरोग्य तपासणी करून आजारांचे पान २ वर

### बालआरोग्य संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण पुढाकार

**२६ विद्यार्थी : जिभेखालील जिव्हाबंधाच्या समस्येवर शस्त्रक्रिया.**
**२ विद्यार्थी : अन्य प्रकारच्या शस्त्रक्रिया.**
**तज्ज्ञ सेवा : जिल्हा रुग्णालय, बीड येथील नाक, कान व घसा शस्त्रक्रियातज्ज्ञ डॉ. राहुल दुबाले यांच्याकडून उपचार.**
**आरोग्य तपासणी ते उपचार : शाळा व अंगणवाड्यांतील तपासणीतून पात्र विद्यार्थ्यांची निवड.**
**समन्वय : जिल्हा आरोग्य विभाग, तालुकास्तरीय शालेय आरोग्य पथक आणि उपजिल्हा रुग्णालय, गेवराई यांचा सहभाग.**

# मुख्यमंत्री साहेब,जनाची नाही तर मनाची बाळगा!पुर्ण मदतीसाठी डिसेंबरची वाट कशाला?

**लोकनायक वृत्तसेवा –**
राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी संकटांच्या खाईत लोटला असताना दिवाळीसाठी पाच हजार रुपयांची मदत जाहीर करून उर्वरित मदत डिसेंबरपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याचा निर्णय म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे. 'मुख्यमंत्री साहेब, जनाची नाही तर मनाची बाळगा! अनेकदा घोषणा केली की शेतकऱ्यांना


पुर्ण मदत दिवाळी देण्यात येईल मात्र मदत जाहीर करताना ॲग्रीम म्हणून ५ हजार दिवाळीत तर उर्वरित मदत

डिसेंबरमध्ये; मग शेतकऱ्यांनी दिवाळी साजरी कशी करायची?' असा संतप्त सवाल भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते तथा किसान सभेचे कॉ. महादेव नागरगोजे यांनी उपस्थित केला आहे. राज्य सरकारच्या या घोषणेचा त्यांनी तीव्र शब्दांत निषेध केला आहे.

राज्यातील अनेक भागांत दीर्घकाळ पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामातील सोयाबीन, उडीद, मूग, मका आणि बाजरी यांसारखी पिके उद्ध्वस्त झाली आहेत. नद्या-नाले कोरडे पडले असून लहान-मोठ्या जलप्रकल्पांतील पाणीसाठाही घटला आहे. गावागावांत पिण्याच्या पाण्याची, जनावरांच्या चारा-पाण्याची समस्या गंभीर बनली आहे. शेतकऱ्यांच्या हाताला काम नसल्याने शेतमजुरांचीही उपासमार होत आहे. अशा विदारक परिस्थितीत शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याऐवजी मदतीची रक्कम उशिरा देण्याची घोषणा करून सरकार नेमके कोणाचे हित जपत आहे, असा सवाल नागरगोजे यांनी केला.महाराष्ट्र शासनाने २५ सप्टेंबर २०२६ रोजी दुष्काळ जाहीर करत ३०५ तालुक्यांचा समावेश केल्याचा उल्लेख करत नागरगोजे म्हणाले की, दुष्काळाच्या पाहणीसाठी केंद्रीय पथकापासून मुख्यमंत्री, मंत्री, आमदार आणि खासदारांपर्यंत पान २ वर

# आष्टी तालुक्यात दुष्काळाचे सावट! पाणीटंचाईवर तातडीने उपाययोजना करा; रविकाका ढोबळे यांची मागणी

**लोकनायक वृत्तसेवा –**
बीड जिल्ह्यासह आष्टी तालुक्यात यंदा पावसाने ओढ दिल्याने शेतीचे मोठे नुकसान झाले असून, ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पावसाअभावी खरीप पिकांची अवस्था बिकट झाली असून, शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यातच जनावरांच्या चारा-पाण्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असल्याने प्रशासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा माजी जिल्हा परिषद सदस्य रवि (काका) ढोबळे पाटील यांनी केली आहे.

यासंदर्भात त्यांनी आष्टीच्या तहसीलदारांना निवेदन सादर करून टंचाईग्रस्त गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी केली आहे.पावसाने पाठ फिरवल्याने शेतकरी हवालदिल यंदाच्या खरीप हंगामात समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांच्या आशेवर पाणी फिरले आहे. सोयाबीन, तूर, मूग, उडीद, कापूस आणि बाजरी यांसारख्या पिकांना पाण्याची आवश्यकता असताना पावसाने दडी मारल्यामुळे पिकांची वाढ खुंटली आहे. अनेक ठिकाणी पिके करपण्याची परिस्थिती निर्माण झाली असून, उत्पादनात मोठी घट होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

शेतकऱ्यांनी बियाणे, खते, औषधे आणि मशागतीसाठी मोठा खर्च केला आहे. मात्र, पावसाअभावी पिके संकटात सापडल्याने हा खर्च भरून निघणार की नाही, याची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. शेतीवरच कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांसमोर आता आर्थिक संकट उभे पान २ वर

# चोरीचा उलगडा;स्थानिक गुन्हे शाखेची दमदार कामगिरी

**लोकनायक वृत्तसेवा –**
परळी शहरातील गांधी मार्केट परिसरातील रेडीमेड कपड्यांच्या दुकानाचे शटर उचकटून रोकड चोरी करणाऱ्या आंतरराज्य टोळीचा बीड पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी या टोळीतील दोन आरोपींना अटक करून त्यांच्याकडून ७१,४०० रुपयांची रोकड जप्त केली आहे.



दिनांक १० ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री २:०० ते २:३० वाजण्याच्या सुमारास, परळी येथील गांधी मार्केटमधील 'अजय कलेक्शन' या रेडीमेड कपड्यांच्या दुकानाचे शटर उचकटून अंदाजे १,५०,०००/- रुपये रोख रक्कम चोरीला गेली होती. याप्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २१८/२०२६, भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३३१(३), ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांच्या पथकाने घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू केला. दिनांक १४.१०.२०२६ रोजी पाटोदा येथून दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले. सखोल चौकशीत त्यांनी या चोरीची कबुली दिली.

अटक करण्यात आलेल्या आरोपीमध्ये पान २ वर

# अहिल्यादेवी सृष्टी चोंडीतच झाली पाहिजे!-पांडुरंग माने

## दोन नेत्यांच्या राजकीय वादात अहिल्यादेवी सृष्टीला अडथळे का? ६०० कोटींचा प्रस्ताव मंजूर; मग प्रकल्प रखडला का?

**लोकनायक वृत्तसेवा –**
जामखेड तालुक्यातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मगाव असलेल्या चोंडी येथेच 'अहिल्यादेवी सृष्टी' उभारण्यात यावी, ही समस्त अहिल्या भक्तांची सकारात्मक आणि रास्त मागणी आहे.

मात्र, अहिल्यानगर जिल्ह्यातील दोन मातब्बर नेत्यांमधील



राजकीय मतभेद आणि रस्सीखेच यामुळे गेल्या वर्षभरापासून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला अडथळे निर्माण होत असल्याचे चित्र दिसत आहे. हा प्रकल्प राजकारणाचा विषय नसून संपूर्ण समाजाच्या अस्मितेचा, इतिहासाचा आणि प्रेरणेचा विषय आहे.

म्हणूनच आमचा दोन्ही वरिष्ठ नेत्यांना सज्जड इशारा आहे ङ्ख

अहिल्यादेवी सृष्टीच्या कामात राजकारण आणू नका!

सत्तेचे राजकारण आणि वैयक्तिक मतभेद बाजूला ठेवून अहिल्यादेवींच्या कार्याचा सन्मान राखा. अन्यथा, अहिल्या भक्तांच्या तीव्र लोकशाही मार्गाने होणाऱ्या निषेधाला सामोरे जाण्याची तयारी ठेवा!

चोंडी हेच पान २ वर

# दुष्काळग्रस्त शेतकरी,पशुधन आणि फळबागांसाठी आ.सुरेश धस यांचा शासनाकडे पाठपुरावा

**लोकनायक वृत्तसेवा –**
आष्टी विधानसभा मतदारसंघातील आष्टी, पाटोदा आणि शिरूर (कासार) तालुक्यांत अपुऱ्या पावसामुळे निर्माण झालेली तीव्र पाणीटंचाई, पशुधनाच्या चारा-पाण्याचा प्रश्न आणि शेतकऱ्यांच्या फळबागांवर ओढवलेले संकट लक्षात घेऊन आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्री मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब आणि महसूल मंत्री मा.ना.श्री. चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांच्याकडे विविध मागण्यांची निवेदने सादर



केली. दुष्काळी परिस्थितीत शेतकरी, पशुपालक आणि ग्रामीण नागरिकांना दिलासा देण्यासाठी तातडीच्या उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी केली आहे.आष्टी विधानसभा मतदारसंघातील अनेक शेतकरी शेतीसोबत दुग्धव्यवसाय करतात. अपुऱ्या पावसामुळे जनावरांसाठी चारा आणि पिण्याचे पाणी उपलब्ध करणे कठीण झाले आहे. त्यामुळे आष्टी, पाटोदा व शिरूर तालुक्यांत मागणीनुसार जनावरांच्या छावण्या सुरू करण्यास परवानगी द्यावी, पान २ वर

# दीड वर्षांपासून 'मृत्यूचा सापळा' ठरलेला विद्युत पोल अखेर नगरसेविका संध्या देठे यांच्या आक्रमक पाठपुराव्याने हटणार..!

**लोकनायक वृत्तसेवा –**
जालना शहर महानगरपालिका कार्यालयासमोर, प्रभाग क्रमांक ९ मधील स्वामी विवेकानंद चौक ते महात्मा गांधी रोड दरम्यान रस्त्याच्या मधोमध असलेला धोकादायक विद्युत पोल अखेर स्थलांतरित होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. गेल्या दीड वर्षांपासून नागरिकांच्या



सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण करणाऱ्या या पोलच्या स्थलांतरासाठी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती तथा प्रभाग क्रमांक ९ च्या नगरसेविका सौ. संध्या संजय देठे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांनंतर महावितरणकडून पोल स्थलांतराच्या कामाचे अंदाजपत्रक मंजूर झाले असून, लवकरच प्रत्यक्ष काम सुरू होण्याची अपेक्षा आहे. पान २

प्रो.प्रा. सुजीत गुंजाळ 9975025031
॥ तुळजाभवानी प्रसन्न ॥
प्रो.प्रा.अभिजीत गायकवाड 9852551818
आम्ही घडवतो एक रंगित विश्व...!
सत्यम ग्राफिक्स
बॅनर प्रिंटींग
स्टार प्रिंटींग
वनवे प्रिंटींग
विनायल प्रिंटींग
बॅक लाईट
१२ X १८ स्टिकर
सर्व प्रकारची डिझायनिंग व प्रिंटींग
➤ सत्यम ग्राफिक्स,बीड.

सुचना
दैनिक बीडचा **लोकनायक** वृत्त पत्रातुन प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी यासंबधी व्यवहार करावा. जाहीरातीत आपल्या उत्पादन व सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात. त्यांची लोकनायक वृत्तपत्र समुह कोणतीही हामी घेत नसुन केलेल्या दाव्याची पुर्तता. जाहिरातदाराकडुन न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल लोकनायक वृत्तपत्र

हॉटेल जय महाराष्ट्र
शिवाजीनगर, बार्शी रोड, बीड
शाकाहारी व मांसाहारी उत्कृष्ट जेवण मिळण्याचे एकमेव ठिकाण
प्रो.नवनाथ शिराळे
मो.नं. ९४२२२४००६५
९८२२७७५९४५

प्रोप्रा.नरेंद्र करमाळकर
मो.नं.९४२०७९८९२९
निलेश करमाळकर
मो.नं.९८२२४४८८५२
न्यु करमाळकर ज्वेलर्स
Since1999
G.S.T.N. No.27BKAPK8972L2ZI
बुंदलेपुरा, अग्नीशामक रोड, बीड ४३११२२

This newspaper printed by owner printer publisher editor Bharat Devdas Gaikwad chief editors Abhijeet Gaikwad at indradhanush printers and publishers near post office paid bid Kharagpur Beed 431122 Maharashtra and published at the office of Dainik loknayak near Kharagpura beed 431122 Maharashtra

हे पत्रक मालक मुद्रक प्रकाशक संपादक भारत देविदास गायकवाड कार्यकारी संपादक अभिजीत गायकवाड यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स अँड पब्लिशर्स पोस्ट ऑफिस जवळ पेठ बीड खडकपुरा बीड जिल्हा बीड ४३ ११ २२ महाराष्ट्र येथे छापून दैनिक बीडचा लोकनायक कार्यालय पोस्ट ऑफिस जवळ पेठ बीड खडकपुरा बीड जिल्हा बीड ४३ ११ २२ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले निवासी संपादिका नायरा राज मुळे पी आर बी कायद्यानुसार सर्व वादविवाद बीड न्याय कक्षेत मोबाईल नंबर ९८ ५० १६ ५० ८२ / ९४ २० ४०६०१९ email- dainikloknayak@gmail.com

loknayak 16.10.2026:Copy of Layout 1 10/15/2026 11:53 PM Page 5

बीड ।जालना। छत्रपती संभाजीनगर । पुणे । अहमदनगर,सोलापूर,नागपूर,यवतमाळ → आर. एन. आय. एमएएच /एमएआर / २०१४/ ५८०९० → गुरुवार दि १५ ऑक्टोबर २०२६ → वर्ष १० वे → अंक -१३२ → पाने ४ → किंमत २ रु

Beed /Jalna/ Chatrapati Sambhajinagar / pune / Ahamadnagar → RNI : Regd.No.MAHMAR/2014/58090 → Thiusday Date: 15October 2026 → 10 th Year → 04 Paper → Pages : 4 → Price - 2 Rupees



## तिसरी माळ

तृतीयेचे दिवशी अंबे शृंगार मांडिला हो ।। मळवट पातळ चोळी कंटी हार मुक्ताफळा हो । कंठीची पदकें कारों पीतांवर पिवळा हो ।। अष्टभुजा मिरवती अंबे सुंदर दिसे लीला

महाराष्ट्राचा महानायक

# लोकनायक

संपादक - भारत गायकवाड

# केजमध्ये १५ दिवसांत एसीबीची दुसरी कारवाई!

## शिक्षण विभागातील लाचखोरीचा प्रकार उघड; एक अधिकारी व एक शिक्षक एसीबीच्या जाळ्यात

### चौकशी अहवालाच्या प्रकरणात २० हजारांची लाच स्वीकारल्याचा आरोप; जालना एसीबी पथकाची धडक कारवाई!

**केज तालुक्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) अवघ्या १५ दिवसांत दुसरी कारवाई केल्याने प्रशासकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडाली असून चौकशी अहवालाच्या प्रकरणात २० हजार रुपयांची लाच स्वीकारल्याच्या आरोप-ावरून केज येथील कनिष्ठ शिक्षण विभातील एक अधिकारी आणि एक जिल्हा परिषद शिक्षक या दोघांना जालना येथील एसीबीच्या पथकाने बुधवारी (दि. १४ ऑक्टोबर २०२६) दुपारी सुमारे ३:०० वाजण्याच्या सुमारास रंगेहाथ पकडल्याची माहिती समोर आली आहे.**

**लोकनायक वृत्तसेवा -**

अनेक वर्षांपासून केजमध्येच कार्यरत असल्याची चर्चा

केज येथील गट साधन केंद्रात अधिकारी म्हणून कार्यरत असलेले एक अधिकारी हे अनेक वर्षांपासून केज येथे कार्यरत असल्याची चर्चा आहे. त्यांच्या या कार्यपद्धतीबाबत यापूर्वीही तालुक्यात उलट सुलट चर्चा होत असल्याचे बोलले जात आहे. प्रशासकीय नियम अधिकारांचा वापर आणि कामकाजाची पद्धत या संदर्भातही काही नागरिकांमध्ये नाराजी असल्याची चर्चा आहे. तसेच स्वतःच्या खाजगी वाहनावर महाराष्ट्र शासनाचा फलक लावून फिरण्याबाबतही आता चर्चा सुरू झाली आहे. मात्र या बाबींची अधिकृत पुष्टी होणे आवश्यक आहे. एसीबीच्या कारवाईनंतर संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीची




**चौकशी अहवालाच्या प्रकरणात लाचेची मागणीमिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराच्या चौकशी अहवालासंदर्भातील कार्यवाही शिक्षण विभागात सुरू होती. संबंधित चौकशी अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवू नये, यासाठी तक्रारदाराकडे २० हजार रुपयांच्या लाचेची मागणी करण्यात आल्याचा आरोप आहे. लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने जालना येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली.**

**या तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबीच्या पथकाने केज येथील शिक्षण विभागाच्या गट साधन केंद्रात सापळा रचला. ठरल्याप्रमाणे २० हजार रुपयांची रक्कम स्वीकारताना एक अधिकारी आणि एक शिक्षक यांना पथकाने पकडल्याची माहिती आहे. या कारवाईमुळे**

आणि प्रशासकीय जबाबदारीची चौकशी होणार का ? याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

शिक्षण विभागात खळबळ पुढील कारवाईकडे लक्ष केज मध्ये **पान २ वर**

## जाहीर आवाहन

**लोकनायक वृत्तसेवा -**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मिडिया परिषदेचे महाराष्ट्र राज्यातील सर्व राज्य जिल्हा व तालुकास्तरा-वरील पदाधिकारी यांना सुचित करण्यात येते की, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने प्रत्येक वर्षी जेष्ठ संपादकांचा गौरव केला जातो. त्या अनुषंगानेच मुंबईमध्ये येत्या १७ ऑक्टोबर २०२६ शनिवारी रोजी सायंकाळी सहा वाजता शिवसेनेचे पक्षप्रमुख मा.श्री उद्धव ठाकरे साहेब यांच्या शुभहस्ते व अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा.श्री.एस.एम.देशमुख सर* यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होत आहे. या कार्यक्रमासाठी आपण राज्याचे,जिल्ह्याचे व तालुक्याचे पदाधिकारी आहोत या नात्याने आवर्जून उपस्थित राहणे बंधनकारक आहे. तरी महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मीडिया परिषदेच्या सर्व राज्य जिल्हा व तालुका स्तरा-वरील पदाधिकाऱ्यांना नंम्र आव्हान करण्यात येते की आपण सर्वांनी या सोहळ्यात सहभागी व्हावे.



**धन्यवाद**
**अनिल वाघमारे**
**प्रदेशाध्यक्ष, डिजिटल मिडिया परिषद, महाराष्ट्र राज्य**

# परळी शहरातून तीन मुली बेपत्ता;पोलीस ठाण्यात तीन स्वतंत्र गुन्हे

**लोकनायक वृत्तसेवा -**

परळी शहरातून गेल्या दोन दिवसांत तीन अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याच्या घटना समोर आल्याने पालकवर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी संभाजीनगर पोलीस ठाण्यात तीन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून, पोलिसांकडून मुलींचा शोध घेतला जात आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १२ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास शिव-ाजीनगर परिसरातील एका १६ वर्षीय मुलीला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याची तक्रार तिच्या वडिलांनी दिली आहे. या प्रकरणी १३ ऑक्टोबर रोजी गुन्हा क्रमांक २४९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १३७ (२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास ग्रेड पोलीस उपनिरीक्षक नागरगोजे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

दुसऱ्या घटनेत, गणेशपार भागातील गोंडेगल्ली परिसरातील




एका १६ वर्षे ६ महिन्यांच्या मुलीला १३ ऑक्टोबर रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याची तक्रार नोंदविण्यात आली आहे. या प्रकरणी गुन्हा क्रमांक २४८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १३७ (२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सपोनि गौड करीत आहेत.

### दोन दिवसांत तीन मुली बेपत्ता; मुलींच्या पालकांत चिंता

**दरम्यान, शहरातून दोन दिवसांत तीन अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याने खळबळ माजली आहे. अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याच्या घटनांमुळे पालकांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. पोलिसांनी या प्रकरणांचा गांभीर्याने तपास करून मुलींचा लवकरात लवकर शोध घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्नही या घटनांमुळे ऐरणीवर आला आहे.**

तिसऱ्या घटनेत गणेशपार भागातील देशपांडे गल्ली परिसरातील १२ वर्षीय मुलीला १३ ऑक्टोबर रोजी दुपारी ४.२० वा. सुमारास अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याची तक्रार नोंदविण्यात आली आहे. या प्रकरणी गुन्हा क्रमांक २५०/२०२६ कलम १३७ (२) **पान २ वर**

# परळी मतदारसंघ महायुतीच्या वतीने गुरुवारी पदवीधरांचा मेळावा; धनंजय मुंडे करणार मार्गदर्शन

## सतीश चव्हाण यांच्या विजयी चौकारासाठी धनंजय मुंडेकडून मोर्चेबांधणी

**लोकनायक वृत्तसेवा -**

मराठवाडा पदवीधर मतदारसंघ विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने महायुतीच्या वतीने परळी वैद्यनाथ विधानसभा मतदारसंघाचा पदवीधरांचा गुरुवार (ता.१५) रोजी सकाळी साडेअकरा वाजता मेळावा आयोजित करण्यात आला असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे हे या मेळाव्यातून पदवीधरांशी संवाद साधणार आहेत. हा मेळावा सकाळी साडेअकरा वाजता परळी वैद्यनाथ शहरातील अक्षता मंगल कार्यालय (छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसर) येथे आयोजित करण्यात येत असून पदवीधरांचे आमदार सतीश भानुदास चव्हाण यांच्या विजयी चौकारासाठी धनंजय मुंडे यांच्याकडून **पान २ वर**

# आष्टी तालुक्यातील रेशन धान्याच्या गोडाऊनची तपासणी कधी होणार? पुरवठा विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह!

**लोकनायक वृत्तसेवा -**

आष्टी तालुक्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत रेशन धान्याच्या साठवणुकीसाठी आणि वितरणासाठी वापरल्या जाणाऱ्या गोडाऊनच्या कामकाजाची तपासणी करण्याची गरज व्यक्त होत आहे. शासनाकडून पात्र लाभार्थ्यांना धान्य उपलब्ध करून देण्यासाठी पुरवठा यंत्रणेमार्फत धान्यसाठा आणि वितरणाचे नियोजन केले जाते. या संपूर्ण प्रक्रियेत गोडाऊनची भूमिका महत्त्वाची असल्याने तेथील धान्यसाठा, नोंदी आणि वितरण व्यवस्था पारदर्शक असणे आवश्यक आहे.

गोडाऊनमध्ये किती धान्य प्राप्त झाले, किती धान्य वितरित करण्यात आले, किती साठा शिल्लक आहे आणि नोंदवहीतील आकडेवारी प्रत्यक्ष साठ्याशी जुळते का, याची नियमित पडताळणी होणे गरजेचे आहे. या बाबींची तप-ासणी संबंधित अधिकाऱ्यांकडून केली जाते का, तपासणीचे अहवाल काय आहेत आणि त्रुटी आढळल्यास कोणती कार्यवाही केली जाते, याबाबत स्पष्टता असणे आवश्यक आहे. **पान २ वर**

# आष्टी तालुक्यातील रेशन धान्याच्या गोडाऊनची तपासणी कधी होणार? पुरवठा विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह!

**लोकनायक वृत्तसेवा -**

आष्टी तालुक्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत रेशन धान्याच्या साठवणुकीसाठी आणि वितरणासाठी वापरल्या जाणाऱ्या गोडाऊनच्या कामकाजाची तपासणी करण्याची गरज व्यक्त होत आहे. शासनाकडून पात्र लाभार्थ्यांना धान्य उपलब्ध करून देण्यासाठी पुरवठा यंत्रणेमार्फत धान्यसाठा आणि वितरणाचे नियोजन केले जाते. या संपूर्ण प्रक्रियेत गोडाऊनची भूमिका महत्त्वाची असल्याने तेथील धान्यसाठा, नोंदी आणि वितरण व्यवस्था पारदर्शक असणे आवश्यक आहे.

गोडाऊनमध्ये किती धान्य प्राप्त झाले, किती धान्य वितरित करण्यात आले, किती साठा शिल्लक आहे आणि नोंदवहीतील आकडेवारी प्रत्यक्ष साठ्याशी जुळते का, याची नियमित पडताळणी होणे गरजेचे आहे. या बाबींची तपासणी संबंधित अधिकाऱ्यांकडून केली जाते का, तपासणीचे अहवाल काय आहेत आणि त्रुटी आढळल्यास कोणती कार्यवाही केली जाते, याबाबत स्पष्टता असणे आवश्यक आहे.गोडाऊनमधील धान्यसाठ्याची प्रत्यक्ष मोजणी होते का?

शासकीय धान्यसाठ्याची नोंद आणि प्रत्यक्ष उपलब्ध असलेले धान्य यांची जुळवणी करणे ही महत्त्वाची बाब आहे. गोडाऊनमध्ये उपलब्ध असलेल्या **पान २ वर**

# चांगल्या संकल्पनेतून केलेल्या कार्याला नक्की यश मिळते -- रजनीताई पाटील

**लोकनायक वृत्तसेवा**

गंगामाऊली शुगरच्या पाचव्या गळीत हंगामाला काल सुरुवात करण्यात आली असून या गळीत हंगामाची सुरुवात काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या मा.खा.





रजनीताई पाटील यांच्या हस्ते व चेअरमन लक्ष्मणराव मोरे, ह भ प प्रकाश महाराज बोधले, ह भ प. उद्धव बापू आपेगावकर, किरण पाटील, उद्योगपती राजेंद्र बोडखे , मयूर **पान २ वर**









loknayak 16.10.2026:Copy of Layout 1  10/15/2026  11:53 PM  Page 6